मानपाडा पोलीस ठाणे, डोंबिवली पुर्व, ठाणे शहर कार्यालय:— टेक्नो पंट्रोलपंप शेजारी, कल्याण शिळ रोड,गोलवली डोंबिवली (पुर्व) जि.ठाणे. महाराष्ट्र राज्य, पिन—४२१३०६.
दूरध्वनी क्र. ०२५१—२४७०१०४
E-mail- cp.thane.manpada@mahapolice.gov.in

प्रेस नोट

दिनांक :— २७/०६/२०२५

'' मानपाडा पोलीस ठाणे, डोंबिवली यांनी डाउन टाउन, खोणी पलावा परिसरात १.९३ किलो मेफेड्रॉन (एमडी) कि.अं २.१२ करोड रूपयांचे अंमली पदार्थासह ३ आरोपींना केले जेरबंद''

गुन्हा रजि. नंबर व कलम	गु.र.नं ७३१/२०२५ गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८ (क), २१(क) २२(क)
दाखल दिनांक	दिनांक २७/०६/२०२५
गुन्हयाचे घटनास्थळ	डाउन टाउन, खोणी पलावा परिसर
आरोपी संख्या	आरोपी क्र. १ पुरूष आरोपी वय — २६ वर्षे आरोपी क्र. २ पुरूष आरोपी वय — २० वर्षे आरोपी क्र. ३ महिला आरोपी वय — २१ वर्षे
जप्त मुद्देमाल व कि.अं	एकुण १.९३ किलो मेफेड्रॉन (एमडी) **एकुण कि.अं २.१२ करोड रकमेपेक्षा अधिक किंमतीचा अंमली पदार्थ जप्त**

मानपाडा पोलीस ठाणे डोंबिवली यांनी गोपनीय बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीनुसार दिनांक २६/०६/२०२५ रोजी रात्रौ ११:०० वाजता डाउन टाउन, खोणी पलावा याठिकाणी छापा टाकुन सदर ठिकाणी मिळुन आलेल्या आरोपी क्र. १ कडुन **एकुण १.९३ किलो मेफेड्रॉन (एमडी) एकुण कि.अं २.१२ करोड रकमेपेक्षा** अधिक किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करून गु.र.नं ७३१/२०२५ गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८ (क), २१(क) २२(क) मध्ये त्यास अटक करून त्याचे सोबत राहणाऱ्या परंतु पसार झालेल्या दोन साथिदारांना रातोरात ताब्यात घेवुन अटक केलेली आहे. तसेच इतर आरोपीतांचा शोध घेण्यात येत आहे. अटक आरोपी हे साठा केलेला अंमली पदार्थ हा अटक केलेल्या महिला आरोपीच्या मदतीने विक्री करीत असल्याचे तपासात निष्पन्न झाले असुन पुढील तपास वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अंमली पदार्थांच्या विक्रीबाबत काही गोपनीय माहीती असल्यास अंमली पदार्थ विरोधी कक्ष, कल्याण तसेच मानपाडा पोलीस ठाणे यांच्या दुरध्वनी क्रमांक ०२५१२४७०१०४ यावर संपर्क साधावा. माहीती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येते.

सदरची यशस्वी कामगिरी हि मा. पोलीस आयुक्त, श्री. आशुतोष डुंबरे सो, मा. पोलीस सह आयुक्त, श्री. ज्ञानेश्वर चव्हाण, मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, श्री संजय जाधव सो, मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३ कल्याण श्री अतुल झेंडे सो, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त डोबिवली विभाग श्री सुहास हेमाडे सो, यांचे मार्गदर्शना खाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री संदिपान शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राम चोपडे, सपोनि/कलगोंडा पाटील, सपोनि/संपत फडोळ, पोशि/१३३१ बडे, पोशि/८१८९ दिघे यांचे पथकाने केलेली आहे.